सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /2020/ 861

दिनांक 3 MAR 2020

प्रति,

प्राचार्य /संचालक,

सर्व शासकीय, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,

पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था ,

नागपूर विभाग. नागपूर

विषयः- महाडीबीटी पोर्टलवरील लाभ वितरणांच्या कार्यवाही बाबत.

संदर्भ :- मा. संचालक,तंशिसं,म.रा.मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र क्र.18/तंशिसं/डीबीटी-पोर्टल-2020/79/ दि. 28/02/2020

आपले सरकार डी.बी.टी. पोर्टल (संकेतस्थळ : https://mahadbtmahait.gov.in) वर महाराष्ट्र शासनांच्या विविध योजनांचा समावेश करण्यांत आलेला आहे. त्यापैकी खालील योजना, तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यांत येतात.

1) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना

2) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना

3) उच्च व्यावसायिक व इयत्ता 12 वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना (भाग-1 वैद्यकीय अभ्यासक्रम वगळुन)

शैक्षणिक वर्ष 2019-20 च्या महाडिबीटी पोर्टलवर वेळोवेळी जाहीर केलेल्या वेळापत्रकांनुसार प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यांकरिता तसेच पात्र विद्यार्थी वरील योजनांच्या लाभापासुन वंचित राहू नये. याकरिता आपणांस वारवांर कळविण्यांत आलेले होते. परंतु या विभागांतर्गत येत असलेल्या संस्थांच्या लॉगीन मध्ये प्रलंबित विद्यार्थी असल्याचे उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये निर्दशनास आलेले आहे. तरी याव्दारे आपणांस कळविण्यांत येते की आपल्या संस्थेच्या लॉगीन मध्ये प्रलंबित असलेले अर्ज दि. 06/03/2020 पर्यत नचुकता ऑनलाईनरित्या मजुरीस्तव पाठविण्यांत यावे.

शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या व डीबीटी पोर्टलव्दारे अलॉटमेंट झालेल्या ज्या विद्यार्थ्यांचे **पहिल्या हप्त्यांच्या लाभांचे** देयक जनरेट करुन, मंजूर देयकांची रक्कम महाडीबीटी पोर्टलव्दारे वितरणांसाठी शासनांच्या सेंट्ल पूल खात्यामध्ये जमा करण्यांत आलेली आहे. अशा विद्यार्थ्यांच्या लॉगीनमध्ये लाभाच्या पहिल्या हप्त्यांची रक्कम प्राप्त करण्यांसाठी व्हाउचर रिडिम करण्यासांठी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यांत आलेले आहे. विद्यार्थ्यांकडून ते व्हाउचर रिडिम केल्यानंतर डीबीटी पोर्टलमार्फत योजनेच्या लाभांची रक्कम पात्र विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित/ संस्थेच्या बॅक खात्यामध्ये थेट जमा करण्यांत येणार आहे. याबाबत विद्यार्थ्यांना संस्थांस्तरावर माहिती देण्यांत यावी.

ज्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची **पहिल्या हप्त्यांची रक्कम प्राप्त झालेली असुन दुस-या हप्त्यांची रक्कम** प्राप्त् होण्यासाठी संस्थेच्या लॉगीनमध्ये उपस्थिती भरण्यांसाठी प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांची यादीनुसार विद्यार्थ्यांचा उपस्थिती अहवाल सादर करण्यांत यावा. जेणे करून **दुसरा हप्त्यांची रक्कम प्राप्त करण्यांकरिता विद्यार्थ्यांच्या लॉगीन मध्ये व्हाउचर रिडिम उपलब्ध करण्यांत येईल. तद्नंतर उपलब्ध झालेल्या रिडिम बटनांचा वापर करून दुस-या हप्त्यांची रक्कम विद्यार्थ्याच्या आधार संलग्नित/ संस्थेच्या बॅक खात्यामध्ये थेट जमा करण्यांत येईल. वरील प्रमाणे संस्थास्तरावर कार्यवाही करण्यांत यावी**. जेणे करून लाभार्थी विद्यार्थी सदर लाभांपासुन वंचित राहणार नाही. अन्यथा पात्र विद्यार्थी लाभापासून वंचित राहिल्यास यांची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांची राहील., यांची प्राचार्यांनी कृपया नोंद घ्यावी.

सोबत दि. 28/02/2020 अखेर पर्यंत डिबीटी डॅशबोर्ड रिपोर्ट नुसार विभागीय कार्यालयनिहाय पहिल्या हप्त्यांच्या रिडिम बटनांचा वापर न केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या व संस्थेकडुन दुस-या हप्त्यांसाठीचा उपस्थिती अहवाल न भरलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येचा तक्ता जोडलेला आहे. सदर माहिती संस्थांच्या लॉगीनमध्ये प्रलंबित असल्याने संस्थास्तरावर तात्काळ कार्यवाही करण्यांत यावी. जेणे करून कोणतीही संस्था / विद्यार्थी स्तरावर प्रलंबित राहाणार नाही, यांची दक्षता संस्थेच्या प्राचार्यांनी घ्यावी.

सहपत्रः- वरीलप्रमाणे

(डॉ. राम निबुदे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

प्रतः- मा. संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.,मुंबई-400001 यांना माहितीकरिता मानार्थ सादर.

DBT Dashboard report-28-02-2020-

2018-19 AND 2019-20 -Status of Voucher Not Redeem and Attendance Pending for 2nd Installemnt.

| Division | Scheme | 2018-19 | | | 2019-20 | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Voucher Not Redeem | Pending At Institute (2nd Installment) | Voucher Not Redeem (2nd Installment) | Voucher Not Redeem | Pending At Institute (2nd Installment) |
| Amravati | DrPunjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna(DTE) | 0 | 14 | 0 | 81 | 0 |
| | Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna(EBC) | 0 | 16 | 0 | 0 | 458 |
| | Scholarship for students of minority communities pursuing Higher and Professional courses(DTE) | 0 | 60 | 4 | 0 | 0 |
| **Amravati Total** | | **0** | **90** | **4** | **81** | **458** |
| Aurangabad | DrPunjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna(DTE) | 0 | 68 | 9 | 1,123 | 0 |
| | Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna(EBC) | 0 | 101 | 6 | 0 | 1,905 |
| | Scholarship for students of minority communities pursuing Higher and Professional courses(DTE) | 0 | 63 | 13 | 0 | 0 |
| **Aurangabad Total** | | **0** | **232** | **28** | **1,123** | **1,905** |
| Mumbai | DrPunjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna(DTE) | 0 | 15 | 6 | 103 | 0 |
| | Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna(EBC) | 0 | 129 | 8 | 0 | 4,145 |
| | Scholarship for students of minority communities pursuing Higher and Professional courses(DTE) | 0 | 164 | 6 | 0 | 0 |
| **Mumbai Total** | | **0** | **308** | **20** | **103** | **4,145** |
| Nagpur | DrPunjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna(DTE) | 0 | 22 | 2 | 60 | 0 |
| | Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna(EBC) | 0 | 51 | 1 | 0 | 969 |
| | Scholarship for students of minority communities pursuing Higher and Professional courses(DTE) | 0 | 62 | 3 | 0 | 0 |
| **Nagpur Total** | | **0** | **135** | **6** | **60** | **969** |
| Nashik | DrPunjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna(DTE) | 0 | 36 | 1 | 745 | 0 |
| | Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna(EBC) | 0 | 105 | 1 | 0 | 2,730 |
| | Scholarship for students of minority communities pursuing Higher and Professional courses(DTE) | 0 | 118 | 12 | 0 | 0 |
| **Nashik Total** | | **0** | **259** | **14** | **745** | **2,730** |
| Pune | DrPunjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna(DTE) | 0 | 211 | 24 | 2,780 | 0 |
| | Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna(EBC) | 0 | 256 | 21 | 0 | 8,179 |
| | Scholarship for students of minority communities pursuing Higher and Professional courses(DTE) | 0 | 173 | 9 | 0 | 0 |
| Pune Total | | 0 | 640 | 54 | 2,780 | 8,179 |
| Grand Total | | 0 | 1,664 | 126 | 4,892 | 18,386 |